Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ८, अंक ७]     गुरुवार ते बुधवार, फेब्रुवारी १७-२३, २०२२/माघ २८-फाल्गुन ४, शके १९४३     [पृष्ठे ७, किंमत : रुपये १०.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक—अमरावती विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **भाग एक-शासकीय अधिसूचना :** नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार–अ, चार-ब व चार–क यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | नाही. |
| **संकीर्ण अधिसूचना :** नेमणुका इ. इ., केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १-७ |
| **भाग एक-अ.—**(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | १-६ |

## शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

नाही.

## संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २०७.

BY COLLECTOR

*Notification*

No. 6-Mining Branch-Ws-41-2022.–

In exercise of the power conferred by Section 330 A of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah-XLI of 1966), I, Shanmugarajan S., Collector, Washim hereby direct that the powers conferred and duties imposed on the Collector by or under the provisions of the said code specified in column (2) of the schedule here to, to the extent mentioned in column (3) thereof, shall be exercisable also by the officer mentioned in column (4) of that schedule.—

SCHEDULE

| Sr. No. | Section of the MLR Code 1966 | Extent of Power | Officer to the delegated |
|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) |
| 1 | Sub-section (*7*) of Section 48 | All | Tahsildar |

SCHEDULE–*Contd.*

| (1) | (2) | (3) | (4) |
|---|---|---|---|
| 2 | Sub-section (*8*) of Section 48 | All | Additional Collector / Deputy Collector / Sub-Divisional Officer/Tahsildar/Naib Tasildar/Revenue In spector/Circle Officer/Talathi. |

Washim :
Dated the 11th January 2022.

SHANMUGARAJAN S.,
Collector, Washim.

--------------------

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २०८.

## जिल्हादंडाधिकारी, यांजकडून

**संदर्भ** : (१) पोलीस अधीक्षक, वाशिम यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक जिविशा-का.व.सु.-प्रतिबंधक-५४४२-२०२१, दिनांक १२ नोव्हेंबर २०२१.

(२) या कार्यालयाचे आदेश क्र. कक्ष-३-आ.व्य.-कलि-कावी-१५२६-२०२१, दिनांक २२ ऑक्टोबर २०२१.

**मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७(१)(३) लागू करणेबाबत**

**आदेश**

क्रमांक कक्ष-८-अ. का.(गृह)-कावि-८९१-२०२१.––

ज्याअर्थी, वाशिम जिल्हा जातीयदृष्ट्या संवेदनशील असून जिल्ह्यात मागील काळात घडलेल्या जातीय घटनाच्या प्रतिक्रिया उमटण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सद्यःस्थितीत राज्यात एस. टी. महामंडळ कर्मचारी यांचा महामंडळास महाराष्ट्र शासनात समावेश करण्याचे मागणीसाठी कामबंद आंदोलन सुरू आहे. तसेच राज्यात नोकरीमध्ये पदोन्नतीस मागासवर्गीयांना ३३ टक्के आरक्षण कायम ठेवावे या मागणीसाठी विविध कर्मचारी संघटनांकडून विविध प्रकारच्या आंदोलनांचे आयोजन करण्यात येत आहे. केंद्र सरकराने मंजूर केलेले कृषी विधेयक, शेतकरी कर्जमाफी, पीक कर्जमंजूरी, दुध दरवाढ, वाढती महागाई, विज बील माफी, शेतक-यांना नुकसान भरपाई तसेच इतर विविध मागण्या संदर्भात विरोधी पक्षाचेवतीने तसेच शेतकरी संघटना इत्यादीचे वतीने आंदोलनात्मक कार्यक्रमांचे आयोजन केले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. वाशिम जिल्हा जातीयदृष्ट्या आणि सण उत्सवाचे दृष्टीने अत्यंत संवेदनशील असून मागील काळात जिल्ह्यात घडलेल्या जातीय घटनांच्या प्रतिक्रिया आगामी सण-उत्सवाचे काळात उमटण्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था राखणे सुलभ व्हावे याकरीता दिनांक १३ नोव्हेंबर २०२१ रोजीचे ००.०१ वा. पासून ते दिनांक २७ नोव्हेंबर २०२१ रोजीचे २४.०० वा. पर्यंत मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश निर्गमित होणे बाबतचे पोलीस अधीक्षक, वाशिम यांचे संदर्भिय पत्र क्रमांक (*१*) या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

त्याअर्थी, मी, शण्मुगराजन एस. (भा. प्र. से.), जिल्हादंडाधिकारी, वाशिम, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये मला प्राप्त अधिकाराचा वापर करुन दिनांक १३ नोव्हेंबर २०२१ रोजीचे ००.०१ वा. पासून ते दिनांक २७ नोव्हेंबर २०२१ रोजीचे २४.०० वा. पर्यंत मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश पारीत करीत आहे. सदर आदेश लागू केल्यामुळे वाशिम जिल्ह्यामध्ये खालील गोष्टीकरीता मनाई करण्यात आलेली आहे.

(१) शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, लाठ्या किंवा काठ्या तसेच शारिरीक इजा करण्यासाठी वापरता येतील अशा इतर कोणत्याही तिक्ष्ण वस्तू जवळ बाळगणे.

(२) कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ वाहुन नेण्यास.

(३) दगड किंवा क्षेपणास्त्रे सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे किंवा तशी साधनेजवळ बाळगणे, जमा करणे, किंवा तयार करणे.

(४) व्यक्तीचे प्रेते किंवा मनुष्याकृतीच्या प्रतिमा/आकृत्या यांचे बिभत्स प्रदर्शन करणे.

(५) वाद्य वाजविणे, किंकाळ्या फोडणे किंवा जाहीरपणे प्रक्षोभक घोषणा करणे अशा प्राधिकारांच्या मते ज्यामुळे नागरी सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहचेल किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्या कृतीमध्ये राज्य प्रशासन उलथुन पाडण्याची प्रवृत्ती दिसून येईल अशी आवेशपूर्ण भाषणे करणे, सोंग आणणे, पत्ते खेळणे आणि तशी चिन्हे, चित्रे, फलके किंवा कोणत्याही जिन्नस/वस्तू तयार करणे किंवा त्याचा लोकामध्ये प्रसार/प्रचार करणे.

तसेच मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (३) अन्वये सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यावर पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींच्या जमावास एकत्र जमण्यास किंवा मिरवणूकीस मनाई करीत आहे. तसेच या कार्यालयाचे संदर्भिय आदेश क्रमांक २ अन्वये वाशिम जिल्ह्यामध्ये कोविड-१९ प्रतिबंधक उपाययोजनाचे अनुषंगाने लागू करण्यात आलेल्या बाबींचे पालन करून प्रस्तुत आदेश कामावरील कोणतेही पोलीस अधिकारी किंवा इतर शासकीय/निमशासकीय कर्मचारी किंवा विवाह, अत्यंयात्रा तसेच सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस व कार्यक्रमास लागू राहणार नाहीत. उपरोक्त आदेश मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये संपूर्ण वाशिम जिल्ह्यामध्ये दिनांक १३ नोव्हेंबर २०२१ रोजीचे ००.०१ वा. पासून ते दिनांक २७ नोव्हेंबर २०२१ रोजीचे २४.०० वा. पर्यंत कार्यान्वित राहतील.

प्रस्तुत आदेश लाऊडस्पीकर लावून तसेच ड्रम वाजवून तसेच तहसिल कार्यालय, पोलीस स्टेशन, नगर परिषद कार्यालयाचया सूचना फलकावर दर्शनी भागावर प्रत लावून लागू करण्यात येईल. पोलीस स्टेशन अधिकारी यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात परिस्थितीनुरूप योग्य कारण असेल व तसेच करण्याशिवाय पर्याय नसेल तर अशा परिस्थितीत याबाबत कोणताही आदेश नजिकच्या उपविभागीय पोलीस अधिकारी यांचेशी विचार विनिमय करून आदेश लागू करण्यास उपविभागीय दंडाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच आवश्यकता वाटल्यास उपविभागीय दंडाधिकारी यांनी संवेदनाशील ठिकाणी विशेष कार्यकारी अधिकारी/दंडाधिकारी यांच्या नेमणूका कराव्यात.

दिनांक १३ नोव्हेंबर २०२१.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २०९.

**संदर्भ :** (१) पोलीस अधीक्षक, वाशिम यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक जिविशा-का.व.सु.-प्रतिबंधका-५६१३-२०२१, दिनांक २६ नोव्हेंबर २०२१.

(२) या कार्यालयाचे आदेश क्र. कक्ष-३-आ.व्य.-कलि-कावी-१५२६-२०२१, दिनांक २२ ऑक्टोबर २०२१.

**मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७(१)(३) लागू करणेबाबत**

**आदेश**

क्रमांक कक्ष-८-अ. का.(गृह)-कावि-९२२-२०२१.—

ज्याअर्थी, वाशिम जिल्ह्यात दिनांक ६ डिसेंबर २०२१ रोजी महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात येणार असून त्यानिमित्त्य जिल्ह्यात विविधि ठिकाणी कँन्डल मार्चचे आयोजन करण्यात येते तसेच ६ डिसेंबर रोजी बाबरी मशीद पतन स्मृती दिन, विजय दिनाच्या अनुषंगाने हिंन्दू/मुस्लीम धर्मीयांतर्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच वाशिम जिल्हा जातीयदृष्ट्या संवेदनशील असून जिल्ह्यात मागील काळात घडलेल्या जातीय घटनांच्या प्रतिक्रिया उमटण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सद्यःस्थितीत राज्यात एस. टी. महामंडळ कर्मचारी यांचा महामंडळास महाराष्ट्र शासनात समावेश करण्याचे मागणीसाठी कामबंद आंदोलन सुरू आहे. तसेच राज्यात नोकरीमध्ये पदोन्नतीस मागासवर्गीयांना ३३ टक्के आरक्षण कायम ठेवावे या मागणीसाठी विविध कर्मचारी संघटनांकडून विविध प्रकारच्या आंदोलनांचे आयोजन करण्यात येत आहे. केंद्र सरकराने मंजूर केलेले कृषी विधेयक, शेतकरी कर्जमाफी, पीक कर्जमंजूरी, दुध दरवाढ, वाढती महागाई, विज बील माफी, शेतक-यांना नुकसान भरपाई तसेच इतर विविध मागण्या संदर्भात विरोधी पक्षाचेवतीने तसेच शेतकरी संघटना इत्यादीचे वतीने आंदोलनात्मक कार्यक्रमांचे आयोजन केले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. वाशिम जिल्हा जातीयदृष्ट्या आणि सण उत्सवाचे दृष्टीने अत्यंत संवेदनशील असून मागील काळात जिल्ह्यात घडलेल्या जातीय घटनांच्या प्रतिक्रिया आगामी सण-उत्सवाचे काळात उमटण्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था राखणे सुलभ व्हावे याकरीता दिनांक २८ नोव्हेंबर २०२१ रोजीचे ००.०१ वा. पासून ते दिनांक १२ डिसेंबर २०२१ रोजीचे २४.०० वा. पर्यंत मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश निर्गमित होणे बाबतचे पोलीस अधीक्षक, वाशिम यांचे संदर्भिय पत्र क्रमांक (१) या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

त्याअर्थी, मी, शण्मुगराजन एस. (भा. प्र. से.), जिल्हादंडाधिकारी, वाशिम, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये मला प्राप्त अधिकाराचा वापर करुन दिनांक २८ नोव्हेंबर २०२१ रोजीचे ००.०१ वा. पासून ते दिनांक १२ डिसेंबर २०२१ रोजीचे २४.०० वा. पर्यंत मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश पारीत करीत आहे. सदर आदेश लागू केल्यामुळे वाशिम जिल्ह्यामध्ये खालील गोष्टीकरीता मनाई करण्यात आलेली आहे.

(१) शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, लाठ्या किंवा काठ्या तसेच शारिरीक इजा करण्यासाठी वापरता येतील अशा इतर कोणत्याही तिक्ष्ण वस्तू जवळ बाळगणे.

(२) कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ वाहुन नेण्यास.

(३) दगड किंवा क्षेपणास्त्रे सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे किंवा तशी साधनेजवळ बाळगणे, जमा करणे, किंवा तयार करणे.

(४) व्यक्तींचे प्रेते किंवा मनुष्याकृतीच्या प्रतिमा/आकृत्या यांचे बिभत्स प्रदर्शन करणे.

(५) वाद्य वाजविणे, किंकाळ्या फोडणे किंवा जाहीरपणे प्रक्षोभक घोषणा करणे अशा प्राधीकारांच्या मते ज्यामुळे नागरी सभ्यता अगर नितीमत्ता यांस धोका पोहचेल किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्या कृतीमध्ये राज्य प्रशासन उलथुन पाडण्याची प्रवृत्ती दिसून येईल अशी आवेशपूर्ण भाषणे करणे, सोंग आणणे, पत्ते खेळणे आणि तशी चिन्हे, चित्रे, फलके किंवा कोणत्याही जिन्नस/वस्तू तयार करणे किंवा त्याचा लोकांमध्ये प्रसार/प्रचार करणे.

तसेच मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (३) अन्वये सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यावर पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींच्या जमावास एकत्र जमण्यास किंवा मिरवणूकीस मनाई करीत आहे. तसेच या कार्यालयाचे संदर्भिय आदेश क्रमांक २ अन्वये वाशिम जिल्ह्यामध्ये कोविड-१९ प्रतिबंधक उपाययोजनाचे अनुषंगाने लागू करण्यात आलेल्या बाबींचे पालन करून प्रस्तुत आदेश कामावरील कोणतेही पोलीस अधिकारी किंवा इतर शासकीय/निमशासकीय कर्मचारी किंवा विवाह, अत्यंयात्रा तसेच सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस व कार्यक्रमास लागू राहणार नाहीत. उपरोक्त आदेश मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये संपूर्ण वाशिम जिल्ह्यामध्ये दिनांक २८ नोव्हेंबर २०२१ रोजीचे ००.०१ वा. पासून ते दिनांक १२ डिसेंबर २०२१ रोजीचे २४.०० वा. पर्यंत कार्यान्वित राहतील.

प्रस्तुत आदेश लाऊडस्पीकर लावून तसेच ड्रम वाजवून तसेच तहसिल कार्यालय, पोलीस स्टेशन, नगर परिषद कार्यालयाच्या सूचना फलकावर दर्शनी भागावर प्रत लावून लागू करण्यात येईल. पोलीस स्टेशन अधिकारी यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात परिस्थितीनुरूप योग्य कारण असेल व तसेच करण्याशिवाय पर्याय नसेल तर अशा परिस्थितीत याबाबत कोणताही आदेश नजिकच्या उपविभागीय पोलीस अधिकारी यांचेशी विचार विनिमय करून आदेश लागू करण्यास उपविभागीय दंडाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच आवश्यकता वाटल्यास उपविभागीय दंडाधिकारी यांनी संवेदनशील ठिकाणी विशेष कार्यकारी अधिकारी/दंडाधिकारी यांच्या नेमणूका कराव्यात.

दिनांक २६ नोव्हेंबर २०२१.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २१०.

**वाचा :** (१) मा. अवर सचिव व उपमुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक : बीआयई-२०२१-प्र. क्र. ६९४-२१-३३, दिनांक ९ नोव्हेंबर २०२१.

(२) सहा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, वाशिम यांचे कार्यालयीन पत्र क्र. कक्ष-२१-सानि-कावि-५१३-२०२१, दिनांक ७ डिसेंबर २०२१.

## आदेश

क्रमांक कक्ष-८-अ. का.(गृह)-कावि-९५३-२०२१.—

ज्याअर्थी, संदर्भ क्रमांक (१) चे पत्रान्वये मा. भारत निवडणूक आयोगाने अकोला-बुलढाणा-वाशिम स्थानिक प्राधिकारी मतदार संघाची द्विवार्षिक निवडणूक २०२१ चा निवडणूक कार्यक्रम जाहीर केलेला असून दिनांक १० डिसेंबर २०२१ रोजी मतदान होणार आहे. त्याअनुषंगाने वाशिम जिल्ह्यातील मतदान केंद्रावर फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ लागू करणेबाबतचे संदर्भिय पत्र क्रमांक (२) या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

ज्याअर्थी, वर नमूद संदर्भ क्रमांक (२) चे पत्राचे अवलोकन करून अकोला-बुलढाणा-वाशिम स्थानिक प्राधिकारी मतदार संघाची द्विवार्षिक निवडणूक २०२१ चे अनुषंगाने वाशिम जिल्ह्यातील मतदान केंद्रावर फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ अंतर्गत प्रतिबंधात्मक आदेश लागू करणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, मी, शण्मुगराजन एस. (भा. प्र. से.), जिल्हादंडाधिकारी, वाशिम, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ अन्वये मला प्रदान अधिकारांचा वापर करुन, निवडणूकीच्या दरम्यान कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने अकोला-बुलढाणा-वाशिम स्थानिक प्राधिकारी मतदार संघाची द्विवार्षिक निवडणूक २०२१ वाशिम जिल्ह्यामधील खालील नमूद मतदान केंद्रावर दिनांक ९ डिसेंबर २०२१ रोजी सकाळी ६.०० वा. ते दिनांक १० डिसेंबर, २०२१ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ प्रतिबंधात्मक आदेश लागू करीत आहे.

| अ. क्र. | मतदान केंद्र क्रमांक | मतदान केंद्राचे नाव |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | ८ | तहसिल कार्यालय, मिटींग हॉल, वाशिम |
| २ | ९ | तहसिल कार्यालय, कारंजा |
| ३ | १० | तहसिल कार्यालय, मंगरूळपीर |
| ४ | ११ | तहसिल कार्यालय, रिसोड |

उपरोक्त प्रमाणे आदेश लागू केल्यामुळे खालील गोष्टीकरीता मनाई करण्यात आली आहे.—

(१) धार्मिक स्थळांचा निवडणूकीचे संबंधाने उपयोग करू नये.

(२) आचारसंहितेच्या संपूर्ण काळात सार्वजनिक ठिकाणी शस्त्र जवळ बाळगता येणार नाही.

(३) मतदानाचे दिवशी मतदान केंद्राचे ठिकाणी १०० मीटर परिसरात निवडणूकीचे कामाव्यतिरिक्त कोणताही व्यक्ती प्रवेश करणार नाही.

सदर आदेश दिनांक ७ डिसेंबर २०२१ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

वाशिम :
दिनांक ७ डिसेंबर २०२१.

**शण्मुगराजन एस.** (भा. प्र. से.),
जिल्हादंडाधिकारी, वाशिम.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २११.

## अपर निबंधक (प्रशासन), सहकारी संस्था, यांजकडून

**वाचा** : (१) या कार्यालयाचे आदेश जा. क्र. पतसंस्था-सआ-५-खर्च-वसूली आदेश २०१८, दिनांक ६-४-२०१८.

(२) या कार्यालयाचे परिपत्रक जा. क्र. पतसंस्था-सआ-५-वसूली अधिकारी नियुक्ती-फेर नियुक्ती-२०१८, दिनांक ३१-१०-२०१८.

(३) मुख्यकार्यकारी अधिकारी, दि मलकापूर अर्बन को-ऑप. बँक लि. मलकापूर, जि. बुलडाणा यांचे दिनांक २०-१२-२०२१ चा प्रस्ताव.

### महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये आदेश

क्रमांक-ना. बँका-१-सआ-मलकापूर बँक-का.क.-१५६-०१-२०२१.—

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन मी, शैलेश कोतमीरे, अपर निबंधक (प्रशासन) सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे या आदेशान्वये दि मलकापूर अर्बन को-ऑप. बँक लि., मलकापूर, जि. बुलडाणा या बँकेच्या खालील अधिका-यांना त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी कलम १०१ व कलम ९८ अन्वये प्राप्त झालेली वसुली प्रमाणपत्रांची अंमलबजावणीबाबत करावयाच्या कार्यवाहीपुरती महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये व नियम १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदीनुसार खालील अटीस अधीन राहून या आदेशाच्या दिनांकापासून ते दिनांक ३१ मार्च २०२२ पर्यंत शक्ती प्रदान करीत आहे.—

### अनुसूची

| अ. क्र. | अधिकार प्रदान करावयाचे अधिका-याचे नाव | अधिकार प्रदान करावयाचे अधिका-यांचा हुद्दा | शक्तीची व्याप्ती | कार्यक्षेत्र जिल्हा |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | श्री. हिरासिंग वासुदेव दिक्षीत .. | वसुली अधिकारी | वसुली अधिकारी | बुलडाणा जिल्हा |
| २ | श्री. संजय रमेश फिरके .. | सहा. शाखा व्यवस्थापक | वसुली अधिकारी | औरंगाबाद जिल्हा |
| ३ | श्री. विनोद ताराचंद्र अग्रवाल .. | सहा. शाखा व्यवस्थापक | वसुली अधिकारी | औरंगाबाद जिल्हा |
| ४ | श्री. राजेंद्र मुरलीधर अकोटकर .. | सहा. शाखा व्यवस्थापक | वसुली अधिकारी | जालना जिल्हा |
| ५ | श्रीमती खुशबू गोवर्धनदास भटड .. | सहा. शाखा व्यवस्थापक | वसुली अधिकारी | पुणे जिल्हा |
| ६ | श्री. प्रवीण सुधाकर लष्करे .. | सहा. शाखा व्यवस्थापक | वसुली अधिकारी | नागपूर जिल्हा |
| ७ | श्री. रावेल रविंद्र देशपांडे .. | सहा. शाखा व्यवस्थापक | वसुली अधिकारी | वर्धा जिल्हा |
| ८ | श्री. संजय सिताराम बोचरे .. | सहा. शाखा व्यवस्थापक | वसुली अधिकारी | अमरावती जिल्हा |
| ९ | श्री. अनिल वसंतराव विचनकर .. | सहा. शाखा व्यवस्थापक | वसुली अधिकारी | अकोला जिल्हा |

**अनुसूची**—चालू

| (१) | (२) | | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|---|
| १० | श्री. सुरज सुधाकर मिनासे | . . | सहा. शाखा व्यवस्थापक | वसुली अधिकारी | यवतमाळ जिल्हा |
| ११ | श्री. संजय मोहनलाल चौधरी | . . | सहा. शाखा व्यवस्थापक | वसुली अधिकारी | जळगाव जिल्हा |
| १२ | श्री. दिलीप वसंतराव पाटील | . . | सहा. शाखा व्यवस्थापक | वसुली अधिकारी | मोताळा तालुका |
| १३ | श्रीमती प्रिया अनिल मिरखेलकर | . . | सहा. शाखा व्यवस्थापक | वसुली अधिकारी | औरंगाबाद जिल्हा |
| १४. | श्रीमती मनीषा अरूण सुगंधी | . . | सहा. शाखा व्यवस्थापक | वसुली अधिकारी | औरंगाबाद जिल्हा |

**अटी :–**

(१) वसूली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ व नियम, १९६१ चे नियम १०७ मधील तरतूदीनुसार कर्ज वसूलीची कार्यवाही करावी. कर्ज वसूली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतूदी व परिपत्रकीय सुचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती चौकशी करून आवश्यकता भासल्यास सदरचे प्रदान केलेले अधिकार तात्काळ काढून घेण्यात येतील.

(२) सदरचे अधिकार सहकार कायदा कलम १०१ व कलम ९८ अन्वये प्राप्त वसूली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरीता असतील.

(३) वसूली अधिकारी यांनी या कार्यालयाने दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी निर्गमीत केलेल्या परिपत्रकानुसार दरमाह विहीत नमुन्यात कर्ज वसुलीची माहिती जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलडाणा यांना सादर करावी.

(४) वसूली अधिकार प्रदान केलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सदर व्यक्ती सेवा निवृत्ती झाल्यास किंवा सदर व्यक्तीस सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास, अशा अधिका-यास प्रदान केलेले अधिकार आपोआप रद्द होतील.

(५) वसूली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानाकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाहीत.

(६) शासन निर्णय क्रमांक संकिर्ण १५०४-प्र. क्र. २३१-१५ स, दिनांक २३ नोव्हेंबर २००६ अन्वये वसुली अधिका-यांना तीन सिंहाच्या राजमुद्रेचा वापर करता येणार नाही.

(७) वसूली अधिका-यास त्याच्या नावापुढे कोठेही "महाराष्ट्र शासन नियुक्त" आणि किंवा "सिव्हील कोर्ट", "एक्झीक्युटिव्ह कोर्ट" या शब्दांचा वापर करता येणार नाही. त्या ऐवजी वसुली अधिका-यांनी त्यांच्या नावापुढे वसुली अधिकारी (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ चे नियम १०७ अन्वये) असे लिहावे.

(८) वसूली अधिका-यास वसूलीसाठी वापर करण्यात येणा-या वाहनावर "वसुली अधिकारी, दि मलकापूर अर्बन को. ऑप. बँक लि., मलकापूर जि. बुलडाणा" असा फलक लावता येईल.

(९) वसूली अधिका-याने पगार जप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या/जामीनदाराच्या पगार कपातीबाबत राष्ट्रीयकृत बँका वा अन्य बँका यांच्याकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देवून परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधित कर्जदार/जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी/पगार करणारा अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्ज वसूल करण्याची कार्यवाही करावी.

(१०) वसूली अधिका-यास, थकबाकीदाराकडून वसुली दाखल्यानुसार वसूलपात्र रक्कम व या कार्यालयाचे कलम १५६ आणि त्याखालील नियम १०७ अन्वये आदेश दिनांक ६-४-२०१८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे व दराने अंमलबाजवणी खर्चाची रक्कम याशिवाय इतर कोणतीही रक्कम वसूल करता येणार नाही.

(११) या कार्यालयाचे दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ रोजीच्या परिपत्रकीय सुचनांचे वसुली अधिकारी यांनी तंतोतंत पालन करावे. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दरमहा वसुली अधिका-यांचे कामकाजाचा कर्जदारनिहाय आढावा परिपत्रकातील प्रपत्र पाच मध्ये नमूद केल्याप्रमाणे घ्यावा.

(१२) वसूली अधिकारी यांनी निर्गमित करावयाच्या नोटीस/आदेश/घोषणा यामध्ये त्यांना अधिकार प्रदान केलेल्या या आदेशाचा संदर्भ, वसुली अधिकारी यांचे नाव, पदनाम व भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करावा.

**शैलेश कोतमीरे**,
अपर निबंधक (प्रशासन),
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे :
दिनांक ३ जानेवारी २०२२.

**पुढील अधिसूचना असाधारण राजपत्र म्हणून त्यांच्यापुढे दर्शविलेल्या दिनांकाला प्रसिध्द झालेली आहे.**

३

**शुक्रवार, फेब्रुवारी ४, २०२२/माघ १५, शके १९४३**

भाग १ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ४.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**शुद्धीपत्र**

क्रमांक-उपजि-भूसं.-र.प्र.-अ.का.-कावि-१०१-२०२२.—

भूसंपादन प्रकरण क्र. १०-४७-२०१५-१६, मौजा बोथबोडण, ता. जिल्हा यवतमाळ या प्रकरणातील कलम १९ ची अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र भाग-एक अमरावती विभागीय पुरवणी मध्ये दिनांक २६ जानेवारी-०१ फेब्रुवारी, २०१७ रोजी पान क्र. ७-९, अ.क्र. ७२ वर प्रसिद्ध झाली आहे. त्यानुसार अंतीम निवाडा दिनांक १९-०६-२०१७ रोजी जाहीर करण्यात आला आहे. परंतु गट बदल दुरूस्ती प्रलंबित असल्याने सदर गट नं. मधील संपादित जमिनीचा मोबदला वाटप स्थगित ठेवण्यात आला. उपअधीक्षक, भूमी अभिलेख, यवतमाळ यांनी सदर प्रकरणातील गट बदल दुरूस्ती अहवाल त्यांचे पत्र जावक (१) क्रमांक ६०२६-२०२१, दिनांक २९-११-२०२१, (२) क्रमांक ५८३२-२०२१, दिनांक २९-११-२०२१, (३) क्रमांक ५८३६-२०२१, दिनांक २९-११-२०२१ नुसार सादर केला आहे. त्यानुसार संपादित शेत गट नं./संपादित क्षेत्रात बदल होत असल्याने अंतीम निवाड्यानुसार पूर्वी संपादित होत असलेल्या शेत जमिनीकरिता/ संपादित क्षेत्राकरिता पुढीलप्रमाणे दुरूस्ती वाचावी.–

| या ऐवजी | | | असे वाचावे | | |
|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | भूमापन किंवा गट क्र. | क्षेत्र हे. आर | अ. क्र. | भूमापन किंवा गट क्र. | क्षेत्र हे. आर |
| १ | १५५ | १ ०५ | १ | १५५ | ० ४१ |
| ३ | १५४ | ० ३० | ३ | १५४ | ० ३१ |
| ४ | १५३ | ० २१ | ४ | १५३ | ० २५ |
| ५ | १५२ | ० १९ | ५ | १५२ | ० २१ |
| ६ | १५१ | ० १७ | ६ | १५१ | ० २१ |
| ७ | १५० | ० १६ | ७ | १५० | ० १६ |
| २२ | २२५ पै | ० ३० | २२ | २२५ पै | ० ३० |
| २३ | २२५ पै | ० ५३ | २३ | २२५ पै | ० २५ |
| . . | . . . | . . . | २३-अ | २२५ पै | ० १५ |

यवतमाळ :
दिनांक २ फेब्रुवारी २०२२.

**अमोल येडगे** (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी, यवतमाळ.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.